# आदिवासी आणि बिगर आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणा पातळीचा तुलनात्मक अभ्यास

**संतोष बबन शेळके**
( PhD Scholar SPPU Pune )

**गोषवारा -** भारत हा जगातील एक अत्यंत वैविध्य पूर्ण देश आहे . भारतीय समाजात अनेक जाती, धर्म , संप्रदाय , वंश , अनेक वर्षांपासून एकत्र राहतात . आदिवासी लोक हाही भारतीय समाजातील एक अविभाज्य भाग आहे. प्रस्तुत अभ्यास हा ग्रामीण व शहरी आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणेचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी केला गेला . प्रत्येक क्षेत्रा मधील यशस्वीतेसाठी संपादन प्रेरणा उच्च असणे अवश्यक असते. सद्य अभ्यासासाठी डॉ . व्ही.पी भार्गव यांची संपादन मापन प्रेरणा चाचणी वापरण्यात आली. नमूना म्हणून हायस्कूल मध्ये इयत्ता नववी व दहावी मध्ये शिकणाऱ्य मुलांचा समावेश करण्यात आला. प्रदत्त विश्लेषणनासाठी spss च्या वर्णनात्मक सांख्यिकी आणि तुलनात्मक अभ्यासासाठी स्वतंत्र नमुना 'टी' चाचणी उपयोगात आणली गेली. प्रस्तुत अभ्यासात आदवासी मुलांमध्ये बिगर आदिवासी मुलांच्या तुलनेत संपादन प्रेरणेत लक्षणीय फरक आढळून आला. तसेच ग्रामीण व शहरी असा तुलनात्मक फरक लक्षणीय आढळून आला.

**कळीचे शब्द - संपादन प्रेरणा, आदिवासी मुले, बिगर आदिवासी मुले, ग्रामीण, शहरी.**

**प्रस्तावना**

प्रस्तुत संशोधनात आदिवासी आणि अ-आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणेचा अभ्यास करणे हे समस्या विधान आहे . भारतीय समाज त्याच्या व्यामिस्र समाजरचनेमुळे जगात नेहमीच कुतुहला चा विषय बनला आहे. एकाच देशात इतकी विविधरंगी समाजरचनेची रुपे खचितच पाहायला मिळतात. ही विविधता फक्त समाज रचनेत नाही तर भौगोलिक आणि वांशिक दृष्ट्या पाहायला मिळते . भारतीय समाज हा विवध सामाजिक, सांस्कृतिक आणि वांशिक गट तसेच जीवन जगण्याचे मार्ग यांचे जटिल मिश्रण आहे . भारतातील आदिवासी समाज हा देखील भारतीय समाजाचा परंतु अजून पावेतो इतर समाज आणि संस्कृती बरोबर एकरूप होण्यास अनेक अडचणींचा सामना करत असलेला विविध वंशांचा एक गट आहे . स्वतंत्र भारतात आज तागायत सातशे पाच च्या वर आदिवासी समूह देशाच्या विविध भागात राहतात . प्रत्यक आदिवासी समूह वंश , भाषा व संस्कृती या दृष्टीने भिन्न असल्याने त्या प्रत्येक समूहाचे प्रश्नही भिन्न आहेत. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी स्वतंत्र भारतात भारतीय राज्यघटनेने त्यांच्या वैविध्य पूर्ण भाषा, परंपरा, समाज रचना संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी पूर्ण संरक्षण बहाल केलेले आहे, असे असले तरी स्वातंत्र्याच्या सत्तर वर्षा नंतर ही या समूहांना अनेक समस्या भेडसावत आहेत. गरीबी, अशिक्षितपणा, बेरोजगारी, पारंपरिक कौशल्य आणि मर्यादित साधने, सततचे स्थलांतर इतर अनेक समस्या यामुळे आदिवासी समाज भारतीय समाजाच्या इतर वर्गाबरोबर स्पर्धा आणि प्रगती साध्य करू शकला नाही. भारतीय सरकार सर्वांगीण विकासाकरीता अनेक योजना राबवून प्रयत्न करत आहे. परंतु ही प्रक्रिया अतिशय संथ आहे.

आदिवासी या शब्दाच्या वेगवेगळ्या शास्त्रज्ञ आणि मानव वंश शास्त्रज्ञ यांनी विविध व्याख्या दिलेल्या आहेत . पारंपारिकपणे या समूहाला मूळ रहिवासी असे म्हणले जाते. आदिवासी समाजावर विविध अभ्यास असे सुचवतात की मुख्य भारतीय समाज प्रवाहाच्या बाबतीत ते अजूनही मागास आहेत . शिक्षण हा एक त्यांच्या बाबतीत कळीचा मुद्दा असून यातही हा समाज मागासलेपणा दर्शवितो. आदिवासींचे शिक्षण हे स्वातंत्र्यपूर्व काळापासून एक आव्हानात्मक काम आहे. २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जमाती आणि उर्वरीत लोकसंख्येच्या साक्षरतेच्या दरामध्ये जवळपास चौदा टक्के अंतर आहे. या समाज समूहातील जवळपास पन्नास टक्के मुले प्राथमिक ते माध्यमिक इयत्तेपर्यन्त शाळा सोडून देतात. त्यांच्यापैकी ऐंशी टक्के मुले दहावी इयत्तेत शिक्षण थांबवतात व फक्त वीस टक्के मुले हायस्कूल परीक्षेला बसतात. देशातील मानव विकास निर्देशांक सुधारण्यासाठी एसटी आणि मुख्य प्रवाहातील समाज यांच्यातील शैक्षणिक दरी दूर करणे गरजेचे आहे. संपादन प्रेरणा हा शैक्षणिक क्षेत्रातील यशस्वीतेसाठी महत्वाचा मानसशास्त्रीय घटक आहे. यास्तव प्रस्तुत अभ्यास महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांवर केंद्रित आहे. महाराष्ट्र राज्यात जवळपास पंचेचाळीस जमातींचे वास्तव्य आहे . यात प्रामुख्याने पुढील जमाती आढळतात. अंध, बैगा, बरडा, बावचा, भइना, भारिया, भूमिया, भत्रा, भिल्ल, भुंजिया, बिनजवर, बिरुळ, धनका, धनवर, धोडिया, दुबळा, गावीत, गोंड, हाळबा, कमर, कातकरी, कावर, खैरवार, खारिया, कोकणा, कोल, कोलाम, कोळीढोर, कोळीमहादेव, कोळी मल्हार,कोंढ, कोरकू, कोया, नगेसईया , नाईकडा, ओरान, परधान, पारधी, पारजा, पटेलिया, पोमला,राठवा, सावर, ठाकुर, वारली, विटोलिया, इ. जमाती आहेत. यापैकी बऱ्याच जमाती काही जिल्ह्यात उदा. ठाणे, नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार, यवतमाळ, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, इ. भागात बहुसंखेने केंद्रित झालेल्या आहेत. या ठिकाणच्या अतिशय दुर्गम आणि जंगलानी वेढलेल्या भागात जसे सह्याद्री पर्वतरांगा, सातपुडा , आणि गोंडवाना येथे आदिवासी राहतात. महाराष्ट्रात प्रामुख्याने भिल्ल ही सर्वात मोठी जमात २५.०४ %, आढळून येते त्या पाठोपाठ कोळीमहादेव १५.६५%, वारली ७.७०%, कोकणा ६.६५%,ठाकूर .४९%,अंध ४.५९%,आणि इतर जमाती २०.७५% आढळून येतात.

जमातींच्या शिक्षणाच्या बाबतीत केलेल्या झाझा(xaxa) समितीच्या अहवालानुसार १८५४ पासून जमातींचे शिक्षण हे पूर्णपणे वासहतवादी सरकारच्या ख्रिश्चन मिशनरीज वर अवलंबून होते. जमातीच्या शिक्षणाबाबत ब्रिटिश वसाहतवादी अतिशय निष्काळजी असल्याने १९५१ मध्ये साक्षरता दर फक्त ३.४६ टक्के इतका होता. स्वातंत्र्योत्तर काळात ही परिस्थिती काहीशी सुधारली असली तरी आदिवासी विद्यार्थी आजही शैक्षणिक बाबतीत मागासलेले आहेत . मुलांसाठी मोफत आणि सक्तीचे शिक्षण कायदा २००९ नुसार वंचित घटकांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला गेला.

काही करणास्तव मधून शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांना पुनःप्रवेश,विशेष प्रशिक्षण यामुळे काहीसा हजेरिपट सुधारला असले तरी गुणवत्तेच्या बाबतीत इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत कमी शैक्षणिक प्रगती दर्शवतात . xaxa समिती या बाबतीत कारणमीमांसा नमूद करते की आदिवासी समाजाच्या भाषिक, सामाजिक व सामाजिक गरजा लक्षात न घेताच अभ्यासक्रम रचना केली जाते,आणि त्यांच्या बोली भाषेला प्राधान्य देण्या ऐवजी त्यांना प्रादेशिक भाषेत अभ्यास साहित्य अध्ययनासाठी दिल्या मुळे त्याचा नकारात्मक परिणाम त्यांच्या शैक्षणिक निरवर्तनावर होतो. आदिवासी मुलांचे शाळा सोडून देण्याचे प्रमाण इतर मुलांपेक्षा लक्षणीय दिसते. शालेय शिक्षणाचे संख्याशास्त्र (२०११) नुसार दहावी इयत्तेत ७३% , अकरावीसाठी ८६% आणि बारावीसाठी ८६% इतके होते. एकूणच आदिवासींची आर्थिक स्थिति अत्यंत हलाखीची असल्याने आणि शाळेत पाठवून कोणतेही उत्पन्न नसल्याने पालक मोबदला मिळवून देणाऱ्या व्यवसायात बालकामगार कायद्याची तमा न बाळगता लहानपणीच गुंतवू पाहतात. पायाभूत सुविधांचा अभाव, सामाजिक विलगीकरण आणि भेदभाव शाळांमध्ये किमान पायाभूत सुविधांची कमतरता, गरीबी, सामाजिक आर्थिक दुरावस्था, सांस्कृतिक विषमता, पूर्वग्रह, पालकांचे सतत स्थलांतर, आदिवासी निवासापासून शाळेचे अंतर, जमाती विशिष्ट परंपरा, कुपोषण, आरोग्य समस्या इत्यादि अनेक कारणांमुळे आदिवासी विद्यार्थी शिक्षणापासून मागे पडत असल्याचे काही अभ्यास दर्शवितात. मानसशास्त्रिय परिवर्त्ये घेऊन खूप कमी प्रमाणात अभ्यास झाल्याचे निदर्शनास येते. प्रस्तुत अभ्यासात आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणेचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**जमातीची व्याख्या -** टोळी हा विकासाच्या आदीम किवा रानटी अवसतेतील लोकांचा एक समूह आहे जो टोळी प्रमुखाचा अधिकार मान्य करतो आणि सामान्यतः स्वतःला एक वंशज मानतो. ( ऑक्सफर्ड डिक्शनरी २०१३ )

टोळी हा प्रादेशिक संलग्नता असलेला, अंतर्विवाह असलेल्या, कार्याचे कोणतेही विषेशिकरण नसलेला, आदिवासी प्रमुखांकडून वंश परंपरागत शासित असलेला, भाषा किंवा बोलीभाषेत एकसंध असलेला, इतर जमातीत किंवा जातींशी सामाजिक अंतर राखणारा, आदिवासी परंपरा, समजुती आणि चालीरीतींना अनुसरून जातीय संरचना असलेला गट आहे. (नदीम हसनेन आणि मजुमदार १९६७) .

भारतीय राज्य घटनेनुसार कलम ३६६ (२५) मध्ये अनुसूचित जमातींचा उल्लेख असे समुदाय आहेत जे घटनेच्या कलम ३४२ नुसार अनुसूचित आहेत. मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि इतर संबंधित सामाजिक शास्त्रांमधील विविध संशोधक आणि तज्ञांनी विविध व्याख्या दिल्या आहेत. ज्यामुळे जमाती समजावून घेण्यात मदत होते.

**संपादन प्रेरणा-** शैक्षणीक क्षेत्रातिल यशस्वीवितेसाठी बुद्धिमत्ते बरोबर संपादन प्रेरणेचा ही महत्वाचा सहभाग असतो. संपादन प्रेरणेचा अभ्यास सर्वप्रथम म्यांक्लेलँड, मरे , अटकीन्सन , फेदर, आणि वायणर यांनी केला. संपादन प्रेरणेची काही वैशिष्ठ्ये असतात. जसे विशिष्ठ कामात किंवा क्षेत्रात अधिक यश संपादनासठी तीव्र इच्छा , शर्थीचे प्रयत्न आणि परीसरावर प्रभुत्व, नियंत्रण प्राप्तीचा प्रयत्न, अडिअडचणींवर मात करत हाती घेतलेल्या कार्यात यश व इतरांपेक्षा वरचढ होण्याचा प्रयत्न या गोष्टींचा अंतर्भाव असतो. संपादन प्रेरणेवरील पूर्व संशोधनाचा आढावा घेतला असता आदिवासी मुलांमध्ये बिगर आदिवासी मुलांच्या तुलनेत संपादन प्रेरणा कमी आढळून आली.

**पूर्व संशोधनाचा आढावा -** विद्याधर सा (२००६) यांना आदिवासी माध्यमिक विद्यार्थ्यांची बिगर आदिवासी विद्यार्थ्यांच्या तुलनेत खूपच कमी संपादन प्रेरणा आढळून आली.

आझाद अहमद अंदराबी (२०१८) यांना ही वरील संशोधनाप्रमानेच परिणाम मिळाले. आदिवासी आणि अ - आदिवासी ५६४ विद्यार्थी यादृछिक पणे तीन माध्यमिक शाळांमधून निवडले आदिवासी विद्यार्थ्यांपेक्षा अ - आदिवासी किशोरवयीन मुलांची शिक्षणिक संपादन उच्च आढळून आली.

प्रजिना पी व्ही (२०१४ ) यांना आदिवासी मुले बीगर आदीवासी विद्यार्थ्यांच्या तुलनेत अक्षम असल्याचे आढळले. ज्यामुळे खराब शैक्षणिक संपादन आणि खराब यशसंपादण प्रेरणा आढळून आली.

मनिदिपा बरूआ १, आशादेवी २ (२०१२) यांनी आदिवासी १२० आणि अ - आदिवासी १२० मुले घेऊन केलेल्या तुलनात्मक अभ्यासात दोन संस्कृतींमध्ये संपादन प्रेरणेच्या बाबतीत लक्षणीय फरक आढळूण आला.

**परिवर्त्ये**

**स्वतंत्र परिवर्त्य संस्कृती** १) आदिवासी विद्यार्थी २) बिगर आदिवासी विद्यार्थी ,क्षेत्र १)ग्रामीण २)शहरी

**परतंत्र परिवर्त्य** - संपादन प्रेरणा

**नियंत्रित परिवर्त्य -** १ ) वय १४ ते १५ वर्ष, २) शिक्षण इयत्ता नववी व दहावी, ३) रहिवास ग्रामीण व शहरी ४) भाषा - मराठी

**अनियंत्रित परिवर्त्य** - १) धर्म ,२) जमात ३) ऊपजमात ४) संस्कृति ५) वंश ६) कुटुंब प्रकार ७) पालक शिक्षण ८) पालक व्यवसाय ९) बोलीभाषा इ.

**संक्रियात्मक व्याख्या** -

**१) आदिवासी विद्यार्थी** - भारतीय राज्यघटनेच्या कलम ३६६ (२५) नुसार कलम ३४२ नुसार अनुसूचित केलेले तसेच राज्य सूचीनुसार घोषित केलेले जमातींचे विद्यार्थी म्हणजे आदिवासी विद्यार्थी होय .

**२) बिगर आदिवासी विद्यार्थी** - भारतीय राज्यघटनेनुसार आणि राज्य सूचिने घोषित केलेल्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी म्हणजे बिगर आदिवासी विद्यार्थी होय.

**३) संपादन प्रेरणा** - डॉ. व्ही . पी भार्गव (१९९४) यांच्या संपादन प्रेरणा मापन चाचणीवरील प्रयुक्तयांचे आलेले प्राप्तअंक म्हणजे संपादन प्रेरणा होय .

**उद्दिष्टे**

१) आदिवासी व अ-आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणेचा अभ्यास करणे.

2 ) ग्रामीण आदिवासी व ग्रामीण अ-आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणेचा अभ्यास करणे.

3) शहरी आदिवासी व शहरी अ-आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणेचा अभ्यास करणे.

**गृहितके**

1) ग्रामीण आदिवासी आणि ग्रामीण बिगर आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरनेत लक्षणीय फरक आढळून येईल.
2) शहरी आदिवासी आणि शहरी बिगर आदिवासी मुलांमध्ये संपादन प्रेरणा पातळी बाबत लक्षणीय फरक आढळून येईल.
3) आदिवासी आणि बिगर आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणा पातळी बाबत लक्षणीय फरक आढळून येईल.

**पद्धती**

**नमूना आणि नमूना चयन -** प्रस्तुत अभ्यासाकरीता अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील हायस्कूल मध्ये शिकणारे 60 आदिवासी व 60 बिगर आदिवासी मुलांची सहेतुकअसंभाव्यता नमूना चयन पद्धतीने निवड करण्यात आली. आदिवासी मुलांमध्ये भिल्ल, पारधी, कोळीमहादेव , या जमातींच्या मुलांचा समावेश होता .

**आखणी २x२**

| विद्यार्थी | ग्रामीण | शहरी | एकुण |
|---|---|---|---|
| आदिवासी | 30 | 30 | ६० |
| अ-आदिवासी | 30 | 30 | ६० |
| एकुण | ६० | ६० | १२० |

**साधने**

प्रस्तुत अभ्यासाकरीता डॉ.व्ही.पी भार्गव यांची संपादन मापन प्रेरणा मापन चाचणी उपयोगात आणली गेली .चाचणीत ५० विधाने असून तीन पर्याय आहेत .चाचणीची विश्वनियाता ०.९१ व वैधता ०.८५ अशी उच्च दर्जाची आहे.

**प्रदत्त संकलन प्रक्रिया**

सरकारी शाळेतील व आस्श्रम शाळेतील हायस्कुलला जाणाऱ्या विद्यार्थ्यांकडून चाचणी प्रशासित करून हस्तपुस्तीकेनुसार गुनांकनाआधारे वर्णनात्मक आणि अनुमानात्मक सांखीकीचा वापरकरून spss चा वापर करून प्रदत्त विश्लेषण केले .

**फलिते**

प्रदत्तांचे उद्दिष्टांनुरूप संख्याशास्रीय विश्लेषण

**तक्ता क्र.१ ग्रामीण आदिवासी व ग्रामीण अ-आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणेचे विश्लेषण** .

| गट | N | DF | Mean | SD | SEM | t | p |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आदिवासी | 30 | 58 | 12.5333 | 8.72860 | 1.59 | 8.536 | 0.01 |
| अ-आदिवासी | 30 | | 32.6333 | 9.49586 | 1.73 | | |

तक्ता क्र.१ ग्रामीण आदिवासी व ग्रामीण अ-आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणेतील फरक दर्शवितो जो ०.०१ पातळीवर लक्षणीय आहे.

**तक्ता क्र.२ शहरी आदिवासी व शहरी अ-आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणेचे विश्लेषण .**

| गट | N | DF | Mean | SD | SEM | t | p |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आदिवासी | 30 | 58 | 17.333 | 8.72860 | 10.51217 | 7.057 | 0.01 |
| अ-आदिवासी | 30 | | 36.9000 | 9.49586 | 10.95870 | | |

तक्ता क्र.२ शहरी आदिवासी व शहरी अ-आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणेतील फरक दर्शवितो जो ०.०१ पातळीवर लक्षणीय आहे.

**तक्ता क्र.३ आदिवासी व अ-आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणेचे विश्लेषण .**

| गट | N | DF | Mean | SD | SEM | t | p |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आदिवासी | 60 | 118 | 14.9333 | 8.72860 | 9.88041 | 5.064 | 0.01 |
| अ-आदिवासी | 60 | | 32.6333 | 25.3167 | 12.43627 | | |

तक्ता क्र.३ आदिवासी व अ-आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणेतील फरक दर्शवितो जो ०.०१ पातळीवर लक्षणीय आहे.

**चर्चा**

प्रदत्ताच्या विश्लेषनांती प्रस्तुत अभ्यासात मांडलेल्या गृहीतांना अनुसरून तीनही गृहीतके स्वीकृत झाल्याचे आढळते .पुर्वसंशोधनातील अनेक अभ्यास सद्य अभ्यासाला पुष्टी देणारे आहेत .

**निष्कर्ष**

१ . ग्रामीण आदिवासी व ग्रामीण अ-आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणा पातळीबाबत लक्षणीय फरक आढळून आला.
२ . शहरी आदिवासी व शहरी अ-आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणा पातळीबाबत लक्षणीय फरक आढळून आला.
३ .आदिवासी व अ-आदिवासी मुलांच्या संपादन प्रेरणा पातळीबाबत लक्षणीय फरक आढळून आला.

**मर्यादा**

१.प्रस्तुत अभ्यास मर्यादित क्षेत्राबाबत केला गेला.
२ .नमुन्याच्या लहान आकारामुळे निष्कर्षांचे सामान्यीकरण करण्यात समस्या आहेत.
३.कोरोना महामारीमुळे शिक्षणावर दुष्परिणाम झाल्याने अभ्यासाचे निष्कर्ष दिशाभूल करणारे असू शकतात.

**सूचना**

१.सामान्यीकरनासाठी मोठा नमुना घेऊन अभ्यास केला जाऊ शकतो .
२ .नियमितपणे शाळा सुरु झाल्यानंतर प्रदत्त संकलन करायला हवे.

३.आदिवासी विद्यार्थ्यांच्या बाबतीत क्षेत्र आणि लिंग घटक अभ्यासला जाऊ शकतो.
४.इतर अनेक मानसशाश्रीय परिवर्त्ये जसे बुद्धिमत्ता, योग्यता ,समायोजन ,मानसिक आरोग्य ,शैक्षणिक स्वसंकल्पना ,स्वसंकल्पना ,अध्ययन अक्षमता इ.घेऊन अभ्यास केला जाऊ शकतो.

संदर्भग्रंथ:

Atkinson, J. W., & Feather, N. T. (Eds.). (1966). A theory of achievement motivation. New York: John Wiley & Sons.

Azad Ahmad Andrabi (2014) *A study of academic achievement among tribal and non-tribal adolescents of kasmir.SRJIS.*

Bhargava V. P(1994),Manual of Achievement Motivation Test.

BidyadharSa(2006). *Achievement motivation among secondary school tribal and non-tribal students. Journal of Indian Education 32 vol 3pp.108-116.*

Mangal S.K.(2006).Statistics in psychology and Education. N.D: Printice Hall.

Manidipa Baruah, Asha Devi, (Nov.-Dec.2012) *Tat Responses on Achievement Motivation among Tribal and Non-Tribal College Students of Assam . IOSR Journal Of Humanities And Social Science (JHSS) ISSN:2279-0837,ISBN:2279-0845.Vol5,Issue3,PP30-36 .*

McClelland, D. C., Atkinson, J. W., Clark, R. A., & Lowell, E. L. (1953). The achievement motive. New York: Appleton Century-Crofts.

Nadeem hasnain(1999),Tribal India: Palaka prakashan Delhi.

NSSO Reports for 2007, 2009 and 2014.

Oxford English Dictionary(2013),Oxford.

Prajin P.V(2014) *A Study on the Academic Achievement Motivation among the Tribal children with special reference to Kannur district Kerala. IOSR Journal Of Humanities And Social Science (IOSR-JHSS) e-ISSN: 2279-0837, p-ISSN: 2279-0845. PP 15-17.*

Singh A.K (1998), Tests, Measurements and Research methods in behavioural sciences, patna- bharti Bhavan.

Statistical Profile of India (2013).

http://tribal.nic.in/Content/StatewiseTribalPopulationpercentageinIndiaScheduleTribes.aspx

https://cjp.org.in/wp-content/uploads/2019/10/2014-Xaxa-Tribal-Committee-Report.pdf

https://tribal.nic.in/ST/LatestListofScheduledtribes

https://tribal.nic.in/Statistics.aspx